17 DEC 2017
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकोपयोगी संशोधनाला चालना मिळणार

## वाधवानी संस्थेशी सरकारने केले सामंजस्य करार

## भारतातील पहिली संस्था मुंबई विद्यापीठात स्थापन

प्रतिनिधी
मुंबई

केंद्र सरकारच्या माध्यमातून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रातील संशोधनावर, विशेषत: ग्रामीण, कृषी विकास, आरोग्य आणि शिक्षण अशा लोकोपयोगी विकासात्मक संशोधनावर अधिकाधिक भर देण्यासाठी वाधवानी इन्स्टिट्यूट ऑफ आर्टिफिशिअल इंटेलिजेन्स आणि महाराष्ट्र सरकार यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आले आहे. याचे पहिले केंद्र मुंबई विद्यापीठामध्ये स्थापन करण्यात आले आहे. या केंद्रातून जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक सोयी–सुविधा आणि मार्गदर्शन या केंद्रामार्फत पुरविले जाईल असे या प्रकल्पाचे स्वरूप आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शनिवारी मुंबई विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्राध्यापक डॉ. अंबुजा साळगावकर आणि श्री वाधवानी यांच्या उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या करारासाठी मुंबई विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विभागामार्फत पुढाकार घेण्यात आला आहे.



**मुंबई : शनिवारी वाधवानी इन्स्टिट्यूट ऑफ आर्टिफिशिअल इंटेलिजेन्स आणि महाराष्ट्र सरकार यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, श्री वाधवानी उपस्थितीत होते.**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जोरावर मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडून आले आहेत. तसेच मानवी जीवन सुकर करण्यासाठी आणि लोककल्याणासाठी अलीकडेच कृत्रिम बुद्धिमत्तेला वैश्विक स्तरावर ओळख निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारच्यावतीने मुंबई विद्यापीठात कृत्रिम बुद्धिमत्ताधारीत संशोधन आणि या विषयातील मानवसंसाधन विकासास चालना देण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रम राबवणारी वाधवानी इन्स्टिट्यूट फॉर आर्टिफिशिअल इंटेलिजन्स ही संस्था स्थापन करण्यात येणार आहे. या सामंजस्य कराराचे स्वरुप सामाजिक समस्यांची उकल हे मूळ उद्दिष्ट्य ठेवून फेलोशिप, संशोधन प्रकल्प, स्टुडंट एक्स्चेंज प्रोग्राम, साईट व्हिजिट, अभ्यासक्रम निश्चिती, पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी लेक्चर्स असे अनुषंगिक कार्यक्रमांचे आयोजन वाधवानी इन्स्टिट्यूट, महाराष्ट्र सरकार आणि मुंबई विद्यापीठ यांच्या सहकार्याने असणार आहे. येत्या दहा वर्षात श्री वाधवानी यांच्या घसघशीत देणगीस आर्थिक स्त्रोतांशी जुळवून सरकारमार्फत सामाजिक हिताचे संशोधन आणि शिक्षण उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. एप्रेंटेशीप आणि रोजगार निर्मितीसाठी बँकिंग, वित्तीय संस्था आणि आयटी कंपन्यांची मदत घेतली जाणार असल्याची माहिती यावेळी प्रभारी कुलगुरु देवानंद शिंदे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 DEC 2017
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात 'लोकविकास'तर्फे मोफत किचन गार्डन प्रशिक्षण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील लोकविकास केंद्रामार्फत गुरुवार २१ डिसेंबर ते २१ एप्रिल, २०१८ या कालावधीत दर गुरुवारी दुपारी १ ते ३ यावेळेत किचन गार्डन प्रशिक्षण" सुरु होणार आहे. या प्रशिक्षणात घरगुती कचऱ्याचे व्यवस्थापन, भाजीपाला व फळे यांची लागवड, टेरेस व बाल्कनी गार्डन, होम गार्डन, ग्राफ्टिंग तसेच जैविक खते व जंतूनाशके, किचन गार्डनिंगचे विविध प्रकार शिकवले जाणार आहेत. हे प्रशिक्षण मोफत असून त्यासाठी वयाची व शिक्षणाची कोणतीही अट नाही. इच्छुकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन लोकविकास केंद्रातर्फे मंजूषा देशपांडे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 DEC 2017
पुढारी

# विद्यापीठात किचन गार्डन प्रशिक्षण बॅच सुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या लोकविकास केंद्रामार्फत किचन गार्डन प्रशिक्षण नवीन बॅच गुरुवार (दि. २१) पासून सुरू होत आहे. प्रत्येक गुरुवारी दुपारी १ ते ३ या वेळेत हे प्रशिक्षण असणार आहे. २१ एप्रिल २०१८ पर्यंत किचन गार्डन प्रशिक्षण असेल. घरगुती कचऱ्याचे व्यवस्थापन, भाजीपाला व फळे यांची लागवड, टेरेस व बाल्कनी गार्डन, होम गार्डन, ग्राफ्टिंग, जैविक खते व जंतुनाशके, किचन गार्डनिंगचे विविध प्रकार या प्रशिक्षणात शिकवले जातील. हा कार्यक्रम पूर्णपणे मोफत असून त्यासाठी वयाची व शिक्षणाची कोणतीही अट नाही.